# मुंबई विद्यापीठ

प्रसिद्धी पत्रक

दिनांक- ३० मे, २०१५

## सिंधु स्वाध्याय संस्था कोकणासाठी राजमार्ग – खा.विनायक राऊत

रत्नागिरी- मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी संकुलामध्ये सुरु होत असलेली सिंधू स्वाध्याय संस्था ही कोकणातील भविष्यकालीन गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच दुर्लक्षित कोकणाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी एक राजमार्ग म्हणून उदयास येणार असल्याचे प्रतिपादन खा.विनायक राऊत यांनी केले.मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी संकुलामध्ये आज सिंधू स्वाध्याय संस्थेच्या कोनशिला समारंभात ते बोलत होते.पुढे ते म्हणाले मुंबई विद्यापीठाने सुरु केलेला हा अत्यंत स्तूत्य उपक्रम असून भविष्यकालीन कोकणातील गरजा भागविण्याच्या दृष्टिकोनातून या संस्थेच्या माध्यमातून कुशल मणुष्यबळ तयार होण्यास नक्कीच मदत होणार आहे.बौध्दीकतेच्या निकषांवर कोकण नक्कीच यशस्वी होणार आहे,या उपक्रमाला केंद्र शासनाकडून सर्वोत्तोरी मदत केली जाणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले.अल्पावधीतच सिंधू स्वाध्याय संस्थेची महती ही सातासमुद्रापार पोहचली ही नक्कीच गौरवास्पद असल्याचेही त्यांनी नमुद केले.सिंधू स्वाध्याय संस्थेमुळे कोकणाचा नक्कीच विकास होणार असल्याचा आशावाद व्यक्त करित या संस्थेच्या उभारणीसाठी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे आणि मा.राज्यमंत्री श्री रविंद्र वायकर तसेच मुंबई विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.राजन वेळूकर आणि बीसीयुडीचे संचालक प्राचार्य डॉ.राजपाल हांडे यांचे अभिनंदन करत समस्त कोकणवासीयांच्या तर्फे आभार मानले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले मुंबई विद्यापीठाचे बीसीयुडीचे संचालक प्राचार्य डॉ.राजपाल हांडे म्हणाले की,मुंबई विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात सिंधुदुर्ग,रत्नागिरी आणि रायगड या जिल्ह्यांवर विशेष लक्ष पुरविले आहे,त्याचा परिणाम हा एक शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यास नक्कीच झाला आहे.या तीन जिल्ह्यात आजमितीस चार 'ए' ग्रेडची महाविद्यालये आहेत.तसेच केंद्र शासनाच्या योजनेतून दोन मॉडेल कॉलेज्सची स्थापना सिंधूदूर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात झाली आहे.तसेच कम्युनिटी महाविद्यालये रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुरु केली आहेत आणि आता सिंधू स्वाध्याय संस्था कोकणात स्थापन होत आहे जेणेकरुन कोकणातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेतल्यानंतर मुंबईची आस न धरता त्यांना कोकणातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.या दृष्टिकोनातून मुंबई विद्यापीठ सदैव तत्पर असेल असेही ते म्हणाले.कोकणभूमीला लागणारे कौशल्याधिष्ठित शिक्षणक्रम सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुरु केले जाणार असल्याचा आशावादही त्यांनी या वेळी बोलतांना व्यक्त केला.या शैक्षणिक वर्षापासून या संस्थेत पीजी डिप्लोमा इन सेफ्टी हेल्थ एन्ड एन्व्हायरमेंट आणि सर्टिफिकेट कोर्स इन फिजीओकेमिकल हायड्रोलॉजी असे दोन शिक्षणक्रम सुरु केले जाणार आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषण करतांना प्रा.विनायक दळवी यांनी सिंधू स्वाध्याय संस्थेची ध्येय, उद्दीष्टे स्पष्ट केली.अल्पावधीत नावारुपाला आलेल्या या संस्थेनी कात टाकली असून ऑस्ट्रेलियातील विद्यापीठाबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात येत आहे.त्यामुळे लवकरच ही संस्था आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करणार असून ७२० किमी.चा समृध्द सागरी किना-याचा शास्त्रोक्त अभ्यास या संस्थेच्या माध्यमातून केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक डॉ.पांडूरंग पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.सप्तर्षी यांनी केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)